दिग्दर्शकांचे मी अभिनंदन करतो. तरुण दिग्दर्शकांनीही असा दिग्दर्शकांचा आदर्श ठेवावा. फार कठिण आहे. थोडा धीर धरावा. स्वतःला establish करायला वेळ लागेल. पण एकदा का यशस्वी दिग्दर्शक म्हणून तुमची ओळख झाली की तुम्हीही नाटयदिग्दर्शन हा पूर्णवेळ व्यवसाय कराल. असे घडावे अशी मी इच्छा करतो.

**तंत्रज्ञ :-**

आज मराठी रंगभूमी वर जे प्रयोग सादर केले जातात त्यांचे दृश्यरुप आपण पाहिले तर नेपथ्यकारांनी नाटकाच्या आशयाचा, विषयाचा स्थळांचा विचार करुप नेपथ्याची रचना केलेली आढळेल. आज प्रदीप मुळये हा असा नेपथ्यकार आहे तो सर्व निर्मात्यांना हवा असतो. असे चित्र भारतात इतरत्र कुठेही दिसत नाही. हा नेपथ्यकार नुसताच नेपथ्यकार नाही तर प्रकाशयोजनाकार वेशभूषाकार आणि दिग्दर्शक सुध्दा. आहे. नाटयमाध्यमाचा सखोल आणि सर्वांगिण विचार करणारा असा हा नेपथ्यकार मराठी रंगभूमीला लाभलाय. दुसरे अनेक नेपथ्यकार आणि प्रकाशयोजनाकार यांनाही विसरता येत नाही. जसा नेपथ्यकार रंगसंगतीचा विचार करतो तसाच विचार प्रकाशयोजनाकारही करतात. म्हणूनच मराठी रंगभूमीवर आज नाटयप्रयोगांचा दर्जा खूप उंचावला आहे.

**अभिनेता :-**

हा फार महत्वाचा घटक आहे. अभिनेत्यांमुळेच प्रयोग जीवंत होतो. आजच्या व्यावसायिक आणि प्रायोगिक रंगभूमीवरील बहुतांश अभिनेते आणि अभिनेत्रीची मानसिकता पाहिली की धसका बसतो. सतरा डगरींवर पाय ठेवणारे हे अभिनेते आहेत. अशांच्या बाबतीत मी म्हणेन, एखाद्या डगरीवरुन घसरलात तर कपाळमोक्ष होईल. ह्यातल्या काहींना असे वाटते की आपणाशिवाय नाटयप्रयोग होऊच शकणार नाही. असाा विचार करणा-या अभिनेत्यांना मी विचारतो की, बाबांनो तुमचे प्रेम कुणावर आहे ? रंगभूमीवर, नाटयसंस्थेवर की स्वतःवर ? असे आढळून येईल की हे असे अभिनेते स्वतः शिवाय दुसरा कुठलाच विचारच करत नाहीत. असे अभिनेते आणि अभिनेत्री रंगभूमीचा उपयोग करुन घेतात. नाटयसंस्थेला Steping Stone म्हणून वापरतात. निष्ठा बांधिलकी हे शब्द अशा कलाकारांना शून्य किंमतीचे. आज अशा कलाकरांना घेऊन नाटक करायचे म्हणजे भिंतीवर डोके आपटून घेण्यासारखे आहे. म्हणूनच की काय, निर्माते कमीत कमी पात्रांच्या नाटकांना प्राधान्य देतात.

काही व्यवसायिक नाटकात मात्र बरेच अभिनेते दिसतात पण निर्माते व अभिनेते यांनी मिळून प्रयोगाचे अयोजन केलेल पाहायला मिळते. तीन तीन महिने आधी वेळापत्रक तयात असल्यामुळे हे शक्य होतं.

शिवाय, व्यावसायिक नाटकासाठी अभिनेत्यांना प्रत्येक प्रयोगाचे मानधन मिळणार असते. असे घडताना प्रायोगिक रंगभूमीवर दिसत नाही . एकतर हे अभिनेते कुठल्या ना कुठल्या ऑफिसात नोकरी करीत असतात शनिवार, रविवार शिवाय ते प्रयोग करायला तयार नसतात. त्यामुळे एखाद्या यशस्वी प्रायोगिक नाटाकांचे दौरे होताना दिसत नाहीत.

काही वेळा ठरलेले प्रयोग असतानाही कोणी अभिनेता "मला शुटिंग आलय" म्हणून निर्मात्यांना तोंडघाशी पाडतात. रसिकहो, ही वस्तुस्थिती आहे. हे सगळ लक्षात घेऊन नवीन नाटकांच्या निर्मितीचा विचार करावा लागतो. किंवा नवीन अभिनेते आणि अभिनेत्री तयार करावे लागतात. कित्येकदा एका पात्रासाठी दोन कलावंत तयार करावे लागतात. तरी ही अधून मधून निर्मात्यांची गोची होतीच.